**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 20.10.2024** **वार – रविवार**

---

**भाजपायादी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीनं 99 उमेदवारांची आपली पहिली यादी आज जाहीर केली. यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दक्षिण पश्चिम नागपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. कामठी मतदारसंघामधून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जामनेरमधून मंत्री गिरीश महाजन, बल्लारपूरमधून मंत्री सुधीर मुनगंटीवार निवडणूक लढवणार आहेत. पुणे शहरातील कोथरूड मतदारसंघातून चंद्रकांत पाटील, शिवाजीनगरमधून सिद्धार्थ शिरोळे, पर्वतीमधून माधुरी मिसाळ या विद्यमान आमदारांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. चिंचवडमधून शंकर जगताप, भोसरीमधून महेश लांडगे तर दौंडमधून राहुल कुल यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**उमेदवारीअर्ज**

दरम्यान विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत असून अर्जांची छाननी ३० ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.

**खरीपपिकविमा**

खरीप पीक विमा काढलेल्या राज्यातल्या शेतकऱ्यांनी विमा कंपन्यांकडे नुकसान भरपाईसंदर्भात सुमारे ७६ लाख ३६ हजार दावे दाखल केले आहेत. या दाव्याचं क्षेत्रीय पातळीवर सर्वेक्षण सुरू आहे; नुकसान

भरपाईबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल अशी माहिती राज्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली. पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत राज्यातल्या १ कोटी ६५ लाख शेतकऱ्यांनी यंदा सहभाग नोंदवला आहे. गेल्या काही महिन्यात झालेल्या पावसामुळे उडीद, मूग, सोयाबीन, कापूस, भाजीपाला, बाजरी या पिकांना मोठा फटका बसला आहे असंही आवटे म्हणाले.

**<u>प्रादेशिकपरिवहनविभाग</u>**

पुण्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांनी त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर येत्या १५ दिवसांत भरावी, असे आदेश पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं दिले आहेत. ज्या शाळा ही माहिती भरणार नाहीत; त्यांना आता शिक्षण विभागाही नोटीस बजावणार आहे. पुण्यात वानवडी परिसरात स्कूल व्हॅन चालकाने अल्पवयीन मुलींवर केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाच्या पार्श्वभमीवर या संबंधी अधिक दक्षता घेण्यात येत आहे.

**<u>डेअरी</u>**

दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय डेअरी आणि फिड प्रदर्शन पिंपरीमध्ये भरवण्यात येणार आहे. येत्या २४ ते २६ ऑक्टोबर या कालावधीत आटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर इथं हे प्रदर्शन आयोजित केलं जाणार आहे. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल अशी माहिती संयोजक, प्राची अरोरा यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>ढेरेसंस्कृतीसंशोधनकेंद्र</u>**

डॉक्टर रामचंद्र चिंतामण ढेरे संस्कृती संशोधन केंद्राच्या वतीनं 'बहुरूपी रामकथा-रामायण परंपरा-अभिजात आणि प्रादेशिक' या विषयावर वर्षभर व्याख्यान मालिका आयोजित केली जाणार आहे. या

व्याख्यानमालेत येत्या २४, २५ आणि  २६ ऑक्टोबरला पुण्यामध्ये दीपाली पाटवदकर आणि डॉक्टर सुनीला गोंधळेकर यांची व्याख्यानं होणार आहेत. शीख रामकथा; तसंच चिनी आणि फारसी रामकथेची ओळख त्या करून देणार आहेत. मसापच्या सभागृहात संध्याकाळी सहा ते साडेसात दरम्यान ही व्याख्यानमाला सर्व रसिकांसाठी खुली आहे.

**<u>बोपदेवघाट</u>**

पुण्यातील बोपदेव घाट अत्याचार प्रकरणातील पीडित तरुणीला 'मनोधैर्य'  योजनेंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळणार आहे. याबाबतच्या अर्जाला विधी सेवा प्राधिकरणाने त्वरित मंजुरी दिली असल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने बटाटा, हिरवी मिरची सिमला मिरची, घेवडा, गवार बीट यांचे भाव वधारले आहेत. गेल्या आठवड्याच्या तुलनेत पालेभाज्यांची आवक घटली असून कोथिंबीर, मेथी, अंबाडीच्या भावात वाढ झाली. फळ बाजारात डाळिंब, पपई आणि पेरूचे भाव घटले आहेत. फुल बाजारातही मंदीचं वातावरण आहे.

**<u>स्नूकर</u>**

पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटनेतर्फे राज्य निवड चाचणी १५-रेड स्नुकर स्पर्धा नुकतीच पार पडली. यामध्ये रोहित रावत याने कृष्णराज अरकोट याचा पराभव करून विजेतेपद मिळवलं.

**<u>एमसीए</u>**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कमलेश पिसाळ यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. सभेआधी झालेल्या बैठकीत अजिंक्य जोशी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बढती देण्यात आली. यापूर्वी ते मुख्य संचालन अधिकारी म्हणून कार्यरत होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या वीजांसह पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे. कमाल तापमान 33 अंश तर किमान 22 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**